# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २७/०६/२००३.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २७/०६/२००३ रोजी सभा सुचना क्र. ०९ दि. २३/०६/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.४५ वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ७) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |
| ८) | श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे | सदस्य |
| ९) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| १०) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ११) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १३) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| १४) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १५) | श्रीम हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ पुजा प्रताप शिंदे | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन प्र. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी. तत्पूर्वी मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाल्यापासुन महानगरपालिकेच्या कार्यक्षमता पाहुन नवनविन अधिकारी येथे येत आहेत. त्यापैकी डी.एम.सी. म्हणुन केळकर साहेब हे आले आहे. हे येथे तत्कालीन मुख्याधिकारी होते. आज त्यांच्याकडे स्थायी समिती उपस्थित राहण्याचा चार्ज दिलेला आहे आणि ह्याच्यापुढे स्थायी समितीमध्ये केळकर साहेब स्वतः उपस्थित राहतील अशी मी त्यांना विनंती करतो.

(मा. सभापती सो. यांनी मा. केळकर सो. ह्यांना पुष्पगुष्छ देऊन त्यांचे स्वागत केले.)

(प्र. सचिव यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७७ चे वाचन केले.)

**महेंद्रसिंग चौहान :-**

यह इतिवृत्तांत इतना लेट क्यो दिया है ।

**मिलन म्हात्रे :-**

खुर्च्या मागवणार होतो त्याची कम्प्लाय रिपोर्ट काय आहे. किती नग मागवणार आहोत.

**गोखले :-**

४० नग मागवले आहेत. वाढले तर वाढवू शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये किती खुर्च्या आहेत. त्याचे मोजमाप घेतल आहे का? प्लास्टिक बकेट किती आहे

**गोखले :-**

४०० खुर्च्या आल्या आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

पान क्र.४ वर कुठला ठराव आहे तो ठराव अजुन आलेला नाही.

**मा. सभापती :-**

जेव्हा एखाद्या विषयावर ऑबजेक्शन घेतले असेल तेव्हा त्या व्यक्तीने बोलले पाहिजे. एखादा विषय मांडलेला आहे त्याच्यावर ऑबजेक्शन असेल तर त्यावेळेला बोलायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

जाणुनबुजुन नाही बोलला तर.

**धनराज अग्रवाल :-**

मी इतिवृत्तांच बोलत नाही. तुम्ही इतिवृत्तांला कम्प्लाईंन बोलता ना. ज्यानी प्रश्न विचारला आहे त्यानेच त्याच्यावरचे प्रतिप्रश्न विचारायचे असे आहे का.

**मा. सभापती :-**

होय हीच पद्धत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

१३/४/०३ च्या सभेत चौपाटीचा जो विषय आहे. त्याचे प्लान बनविले का ? जर तुमच्याकडे प्लान बनवुन तयार असेल तर आम्ही त्या प्लानची कॉपी श्री. राम नाईक यांना पाठवितो.

**शिवप्रकाश भुदेका :-**

प्लान कधी पर्यंत मिळेल.

**मा. सभापती :-**

प्रस्ताव पाठवला असेल त्याची कॉपी देऊन टाका.

**प्रकरण क्र. ७७ :-**

दि. १७/५/२००३ रोजीचे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६८ :-**

दि. १७/०५/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. मिलन वसंत म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(मा. सभापतींच्या संमतीने प्र.सचिवांनी प्रकरण क्र. ८३ चे वाचन केले.)

**दिपक खांबीत :-**

दहा गाळ्यांची केस कोर्टामध्ये आहे. उरलेले चार गाळ्यांची मागणी केली आहे.

**लिओ कोलासो :-**

एकाचे काय झाले.

**दिपक खांबीत :-**

त्यांनी अजुन पत्र दिले नाही.

**लिओ कोलासो :-**

कोर्टाने काय निर्णय दिला आहे.

**दिपक खांबीत :-**

कोर्टाने निर्णय दिलेला नाही. स्टे आहे.

**मा.सभापती :-**

शहरातील ज्या आवश्यक बाबी आहेत त्यांचा प्रस्ताव यायला पाहिजे.

**दिपक खांबीत :-**

त्यांना जुना गाळा दिला होता परंतु त्यांना त्याच्या बदलीमध्ये दुसरा गाळा पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

स्थायी समितीमध्ये मागच्या वेळेला चर्चा झाली होती. तेव्हा विनंती केली होती की बिनभाड्याने गाळा दिला पाहिजे.

**दिपक खांबीत :-**

आपण आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करुया.

**शशिकांत शहा :-**

नाममात्र भाडे घ्यायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब मला ह्याविषयावर बोलायचे आहे. रितसर आपण कोर्टामध्ये जायला पाहिजे होते. चार महिन्याचा कालावधी होता. पण आपण त्याचे उल्लंघन केले आहे. अमुक कागदपत्र द्या असे ते बोलले आहे. त्यावरती ते कोर्टामध्ये गेले होते त्याची आपण पुर्णपणे पुर्तता केलेली नाही. फारुक कुरेशीने एक गाळा हडप करण्याचा प्रयत्न केला आहे. मी ह्या विषयासंदर्भात महासभेत बोललो आहे. परंतु ते नगरपालिकेने ट्रेसपासिंग केलेले नाही. मागच्या वेळेला सभेमध्ये त्यांनी स्टे आणला असे बोलले गेले. तर त्याच्यावर आपल्या वकीलाने काय ॲक्शन घेतली आहे का? दुसरीकडे तुम्ही दीडलाख मागताहेत आणि जे गाळे असे आहेत त्याच्या वर तुम्हाला पाणी सोडायला लागेल. गाळ्याच्या बाबत जर कोर्टाने स्टे दिला आहे तर तुम्ही हायकोर्टात जाऊन तो स्टे उठवायला पाहिजे. आपण आम्हाला ह्या विषयाबाबतत व्यवस्थित खुलासा करुन सांगा.

**दिपक खांबीत :-**

तत्कालीन नगरपरिषदेकडुन चौदा लोकांना पत्र दिले होते. त्याच्यामध्ये फारुख कुरेशी ह्याचा देखील समावेश होता. आपण त्यांना ऑफिशियली गाळे दिलेले नाही. व हे गाळे आपल्याला नगरपालिकेने दिले आहे असे त्यांनी कोर्टामध्ये दावा केला आहे.

**लिओ कोलासो :-**

हे जे चौदा लोक आहेत त्यांच्याशी तुमचे कमीटमेंट झालेले होते का? आज प्रश्न असा आहे जे अगोदरचे टपरीधारक आहेत त्यांच्याकडे ॲग्रीमेंट आहे. त्या ॲग्रीमेंटमध्ये ह्या अटीशर्ती टाकल्या नसतील तर आता कसं तुम्ही टाकु शकता.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेला त्यांनी पुर्तता करायला सांगितले व त्या लोकांनी अनेक वेळा कॅबिनमध्ये फे-या मारल्या आहेत. माझ्यासमोर त्या माणसाने सर्व कागदपत्र दिले व त्यानंतर हे प्रकरण कोर्टात गेले. तो त्या पेपरावर मला सही करायला सांगत होता.

**लिओ कोलासो :-**

मॅटर कोर्टामध्ये कशाकरिता गेले.

**दिपक खांबीत :-**

गाळ्याच्या संदर्भात.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना तुम्ही योग्य तो रिसपॉन्स दिला नाही. माझ्यासमोर त्यांना नगराध्यक्षाच्या कॅबिनमधुन बाहेर काढण्यात आले. त्यांना पजेशन कोणी दिले.

**लिओ कोलासो :-**

हे पजेशन अगोदरचे जे गाळेधारक आहेत त्यांनी घेतले आहे.

**दिपक खांबीत :-**

ज्यांनी पत्र दिले आहे त्यांनी पजेशन दिले आहे.

**लिओ कोलासो :-**

चौदा गाळेधारक होते तर त्या चौदा गाळे धारकांना आपण लॉफुली, पीसफुली, अंडरस्टॅंडिंगने ताबा देऊ शकतो. तर उरलेल्या त्या तीन जणांबद्दल आपण विचार करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

हा जो वाद आहे तो तिघांमध्ये झाला आहे व ते कोर्टामध्ये डिसकस झाले आहे व त्याच्यानंतर निर्णय दिलेला आहे.

**दिपक खांबीत :-**

साहेब अटीशर्ती ठरवून त्यांना गाळा ताब्यात द्यायचे होते. त्यापूर्वीच त्यालोकांनी गाळा ताब्यात घेतला.

**शशिकांत शहा :-**

चावी आपल्या नगरपालिकेकडे होती तर त्यांना चावी कोणी दिली.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्यालोकांना किती वेळा बोलावले आणि ज्यामाणसांची पात्रता नाही त्यांना तुम्ही गाळे दिले. ते गाळे देताना दुसरीकडे अन्य तपासणी केली का? त्या व्यक्तीचा दुसरीकडे व्यवसाय नको अशी अट आहे.

**याकुब कुरेशी :-**

ह्या ज्या आपण अटीशर्ती टाकल्या आहेत त्या चुकीच्या आहेत. नगरपालिकेने त्यांना त्यावेळी लिहुन दिले आहे तुम्हाला सदरच्या गाळ्याऐवजी दुसरा गाळा देण्यात येईल. आणि आता त्यांना जागा देण्याच्या वेळी तुम्ही ह्या अशा अटीशर्ती टाकता हा कोणता न्याय आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य बोलले की, तुम्ही ज्या अटीशर्ती टाकल्या आहेत त्यात त्या व्यक्तीची दुसरी जागा आहे का नाही. पण आपल्याला त्याच्या दुसऱ्या जागेशी काय घेणे आपण आपल्याला भाडे पाहिजे असे बोलतो ना.आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलले की त्यांची आणखीन कुठे गाळा आहे तर ते आपण बघा.

**केळकर साो.(उपआयुक्त) :-**

आम्ही त्या लोकांना बोलावुन सदरच्या विषयाबाबत चर्चा करु.

**अशोक पाटील :-**

वर्षभर आपण त्यांना रखडत ठेवले आहे. त्यांची दुकाने तोडली गेली तेव्हा आपण त्यांना कमिटमेंट दिले की आम्ही तुम्हाला दुसरा गाळा देऊ. ते वर्षभर आपल्याकडे येत आहेत. पण अजुन त्यांना काहीच निर्णय दिला नाही.

**केळकर साो. (उपआयुक्त) :-**

आठ दहा दिवसात चर्चा करुन ह्याच्यावर मार्ग काढण्यात येईल.

**मा. सभापती :-**

ह्या तीन लांकांना आपण चर्चेला बोलवा.

**मिलन म्हात्रे :-**

एक दिड लाख घ्यायचे आहे. तर बँकेकडुन कर्ज मिळत असेल तर तसे घ्यायला सांगा व ती रक्कम जर फार मोठी होत असेल तर इन्स्टॉलमेंट ने द्यायला सांगा.

**मा. सभापती :-**

चर्चा करुन हा विषय महासभेला आणू. गाळे देऊन टाका.

**धनराज अग्रवाल :-**

पहिले निगोसियेशन करा. सगळ्यांना बोलावुन चर्चा करा.

**प्रकरण क्र. ८३ :-**

भाडेकरुंकरिता बांधलेल्या इमारतीमधील गाळेवाटपाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ७४ :-**

मा. स्थायी समिती सभा दि. २४/०४/२००३ प्रकरण क्र. ७ अन्वये सदर विषय प्रलंबित ठेवलेला होता. सदर विषयाचे अवलोकन व्हावे. महानगरपालिकेनेन रस्ता रुंदीकरण करतेवेळी एकूण १४ जणांना पुर्नवसनाकरिता जागा देण्याबाबत पत्र दिलेले होते. मा. महासभेच्या निर्णयानुसार महानगरपालिकेने एकूण १४ जणांना अटीशर्तीची पूर्तता करणेबाबत कळविल्यानंतर १ जणांनी पूर्तता न करता मा. न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर १० जणांनी यापूर्वीच अनधिकृतपणे ताबा घेतलेला आहे. खालील चार जण न्यायालयात गेलेले नाहीत.

१) श्री. निलेश अनंतराव मोहिले
२) श्री. मिश्रीलाल वैष्णव
३) श्री. उमाशंकर बाबूनंदन गुप्ता
४) श्री. रमेश जोशी

वरील चार पैकी अ.क्र. १ व अ.क्र. ४ यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली होती. मा. उच्च न्यायालयाने सदर दोन जणांना महानगरपालिकेने गाळावाटपाबाबत अटीशर्ती ठरवून चार महिन्यात गाळेवाटप करण्याबाबत निर्णय दिलेला आहे. त्यानुसार महानगरपालिकेने अटीशर्ती ठरवून पत्रव्यवहार केला असता त्यांनी अटीशर्तीची पूर्तता केलेली नाही.

त्यापैकी १) श्री. निलेश अनंतराव मोहिले
२) श्री. मिश्रीलाल वेष्णव
३) श्री. उमाशंकर बाबूनंदन गुप्ता

यांनी महानगरपालिकेस लेखी प्रतिज्ञापत्र देऊन न्यायालयात दावा दाखल केलेल्या १० जणाबाबत सदर न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढे महानगरपालिका ठरविल ते भाडे, अनामत रक्कम भरण्यांस तयार असून आम्हांस गाळे देण्यांत यावे असे कळविले आहे. मा. स्थायी समिती मंजुरीच्या अधिन राहून वरील तीन जणांना अटीशर्तीस अधिन राहून गाळे देण्यांत आलेले आहेत. सदर इमारतीत एकूण १६ गाळे असून महानगरपालिकेने पत्र दिलेल्या १४ जणांना द्यावयाच्या गाळ्याव्यतिरिक्त दोन गाळे शिल्लक राहणार आहेत. जुन्या नगरपरिषद कार्यालयाखाली असलेला एक गाळा हिन्दू वैकुण्ठधाम सामग्री भंडार यांच्याकडे असून त्यांनी सदर जागा अपूरी पडत असल्याने सदर गाळा रिकामी करुन सदर नविन इमारतीमध्ये गाळ्याची मागणी केलेली आहे.

वरील प्रस्तावानुसार लेखी प्रतिज्ञापत्र घेऊन देण्यांत आलेल्या गाळ्यांना तसेच हिंदू वेकुण्ठधाम सामग्री भंडार यांच्याकडून जुन्या इमारतीमधील गाळा ताब्यात घेऊन नविन इमारतीमधील रिकामा गाळा मा. आयुक्त यांनी करारनामा अटीशर्तीसह देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी.　　　　अनुमोदन :- श्री. धनराज अग्रवाल.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र.७८ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

त्यांना प्रस्तावित करण्यासाठी किती वर्ष जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या विषयामध्ये एकुण किती लोक आहेत. आपला एक माणुस गोपी ग्रामपंचायत काळापासुन राहत होता तो मेला त्याच्यानंतर आपण ती जागा त्याच्या मुलीला देणार होतो. ते देताना आपण जरा सुधारुन घ्या. एका गाळ्याचे डिसप्युट आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

उत्पन्न गृहीत धरुन म्हणजे काय?

**दिपक खांबीत :-**

उत्पन्न म्हणजे आपण घरभाडे घेता ते.

**प्रकरण क्र. ७८ :-**

महानगरपालिका कार्यालयासमोरील उजव्या बाजुचे रस्ता रुंदीकरणामध्ये तोडण्यात आलेले पालिका कर्मचारी निवासस्थानाचे अस्तित्वात असलेल्या क्षेत्रफळाचे बांधकाम करणेबाबत.

**ठराव क्र. ६९ :-**

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ०१ | महानगरपालिका वर्ग-४ श्रेणी कर्मचारी निवासस्थानाची आवश्यक दुरुस्ती करणे. | रु. १,००,०००/- |

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातून वरील कामांना आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देणेंत येत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.　　　　अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.७९ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

किती पर्यंत आहे.

**श्रीकांत मोरे :-**

२००४ पर्यंत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

जे काम बाकी राहिले आहे ते काम पहिल्यांदा पुर्ण करुन नंतर दुसरे काम आपण घ्या.

**मा. सभापती :-**

काम चालु आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मांडवी तलाव का क्या है क्या? हर वक्त विषय आता है मांडवी तलाव मे बोटींग का.त्याला फाऊंडेशन आहे त्याचे काय. त्याचे पेमेंट नगरपालिकेने केले आहे का?

**मा. सभापती :-**

शिवार गार्डन आणि मांडवी तलाव त्याचे प्रस्ताव आलेले आहे. आपण पुढच्या सभेमध्ये विषय घेणार आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

मांडवी तलावाच्या येंथे भगदाड पडले आहे. तिथे आतापर्यंत डागडुजी केलेली नाही. बांधकाम विभागाने कामकाज बरोबर केले नाही. नगरभवनला उभे राहिले तर सर्व काय ते दिसते.

**मा. सभापती :-**

ते कामकाज आपण बघुन घ्या. व तलाव सुशेभिकरण करुन घ्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

काशिमिराचे धोंडुळे तलाव आहे त्याच्यावर अतिक्रमण झाले आहे.

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेमध्ये तो तलाव किती क्षेत्रफळाचा होता व किती अतिक्रमण झाले आहे त्याचा अहवाल पुढच्या सभेपर्यंत पाहिजे.

**प्रकरण क्र. ७९ :-**

बोटींग कामी तलाव मक्त्याने देणेबाबत.

**ठराव क्र. ७० :-**

महानगरपालिका क्षेत्रातील शिवार गार्डन तलाव, मांडली तलाव बोटींग कामी मक्त्याने यापुर्वी देण्यांत आलेले आहेत. शिवार तलावांतील बोटींग हे नागरिकांना करमणुकीचे साधन असून नागरिक चांगल्या प्रकारे उपभोग घेत आहेत व त्या मक्त्यापासून महानगरपालिकेस चांगले उत्पन्न मिळत आहे.

सार्व. बांधकाम विभाग यांचे अहवालानुसार (१) नवघर नवीन तलाव, (२) जरीमरी तलाव, (३) मुर्धा गांवदेवी तलाव, (४) गोडदेव तलाव हे तलाव बोटींग कामी उपलब्ध करुन देणेंत आले आहेत. त्यापैकी जरीमरी तलाव, काशी येथील काम अपूर्ण आहे ते पूर्ण करुन घ्यावे व चारही तलाव बोटींग कामी प्रशासनाने महानगरपालिकेची किंमत ठरवनू बोली पद्धतीने लिलाव करणेंस प्रशासकीय मंजुरी देणेंत येत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.८० चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

ह्याच्यात आपण लेखापालाचा अभिप्राय घ्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

हयाच्या पहिले खांबीतजी पंचवीस लाखाचे आले होते.

**दिपक खांबीत :-**

मंजुरी आपण स्थायी समितीनेच दिली होती.

**मिलन म्हात्रे :-**

पंचवीस लाखाची तरतुद आहे. ती आपण पुर्ण केली आहे. तसेच स्वतःचे वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरले तर आठ हजार रुपये त्या अधिका-याला द्यायचे असे स्थायी सभेत ठरले आहे.

पाच लाख चाळीस हजाराची एक गाडी आहे मग आपण दहा लाखाचा फिगर का दिला आहे. आपल्याकडे जी तरतुद आहे त्यात आपल्याला अजून बरेच साहित्य घ्यायचे आहे.

**शशिकांत शहा :-**

सहा लाख पास करा.

**मा. सभापती :-**

पहिले आपण कार्यशाळा बनवुन घेऊ.

**मिलन म्हात्रे :-**

दहा लाखासाठी मंजुरी देणार नाही. गाडीची जेवढी रक्कम आहे तेवढीच मंजुरी मिळेल अन्यथा आपण जर हा ठराव पास करत असाल तर त्याला माझा विरोध आहे. आणि आपण मतदान घ्या. गाडीची किंमत ५.४० आहे तर तेवढीच पाहिजे.

**जेम्स कोलासो :-**

५.४० आहे तर आपण एवढी जास्त रक्कम का दिली आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला दोन नविन गाड्या घ्यायच्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही तसं दोन गाड्याचे नमुद करायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

गोषवारा देताना संबंधित विभागाने व्यवस्थित माहिती द्यायला पाहिजे.सभागृहापुढे तुम्ही सुस्पष्ट टिपणी आणा.

**दिपक खांबीत :-**

नंतर आपण सांगितले ही गाडी घ्यायची आहे.

**मा. सभापती :-**

मग तुम्ही व्यवस्थित गोषवारा आणायला पाहिजे होता.

**मिलन म्हात्रे :-**

कार्यशाळेची प्रगती कशी आहे.

**दिपक खांबीत :-**

जागेचा शोध चालु आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला आम्ही सर्वे केला . ब्रीजच्या खाली जागा आहे ती दाखवली गेली आहे तिथे कन्स्ट्रक्शनचा खर्च येणार नाही. आपण पहिल्यांदा जागेचे काहीतरी करा.

**मा. सभापती :-**

दोन गाड्या घ्यायच्या आहेत एक ॲम्बेसिटर व एक एस्टीम.

**प्रकरण क्र. ८० :-**

अंदाजपत्रकिय तरतुद वर्ग करणेबाबत.

**ठराव क्र. ७१ :-**

महानगरपालिका शहर अभियंता यांचेकरिता नविन मारुती इस्टीम खरेदी करणेकामी मा. स्थायी समिती सभा दि. २४/०४/२००३, ठराव क्र. ८ ने मंजुरी दिलेली आहे. तरी सदर कामी सन २००३-०४ चे अंदाजपत्रकात नविन वाहन खरेदी या शिर्षकाखाली तरतुद उपलब्ध नाही. सन २००३-०४ चे अंदाजपत्रक ''वाहन कार्यशाळा'' या शिर्षकाश्खाली रक्कम रु. २५.०० लाख इतकी तरतुद केलेली आहे. परंतु वाहन कार्यशाळेसाठी रक्कम रु. १०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे रु. २५.०० लाखातुन रु. १५,००,०००/- इतकी तरतुद ''नविन वाहन खरेदी'' करिता वर्ग केल्यास शहर अभियंता यांचेसाठी वाहन खरेदी करता येईल.

तरी ''वाहन कार्यशाळा'' या शिर्षकातून ''नविन वाहन खरेदी'' या शिर्षकामध्ये रु. १५.०० लाख तरतुद वर्ग करणेंस सभेची मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच शहर अभियंता सदर नविन गाडी येईपर्यंत भाड्याने वापरत असलेल्या गाडीचे भाडे प्रदान करणेंस व उपआयुक्त, शहर अभियंता व सहाय्यक संचालक नगररचना यांचेकरिता नविन तीन पेट्रोल ॲम्बेसिडर, कंपनीचे अधिकृत विक्रेता यांचेकडून शासकीय दराने खरेदी करणेंस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी.** **अनुमोदन :- श्री. लिओ कोलसो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.८१ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

अग्निशमन दलाचे पाच ते सहा वेळा विषय आला आहे. वेगवेगळ्या सामानांची त्यांनी यादी दिली. आणि आज कुठेही आग लागली तरी सामान नसते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आम्ही मंजुर केलेल सामान अग्निशमन विभागात येते का?

**धनराज अग्रवाल :-**

पाण्याचे टँकर नव्हते. आपले दोन टँकर दिले व त्या टँकरचे लिकेज निघाले.

**मनिष दोशी :-**

आता टँकर पाठविले आहे. टँकर दुरुस्तीला गेले होते.

**धनराज अग्रवाल :-**

लाखो रुपयाचे सामान आणले आहे आणि त्या टँकरच्या टाक्या बरोबर नाही तर काय उपयोग.

**महेंद्रसिंग चौहान :-**

अग्निशमन दल है वो दिखानेके लिए पुरे सदस्य को लेके जाना चाहिए । जगह की व्यवस्था कहाँ पर है । सामान कहाँ पर डाला जाता है ।

**शिवप्रकाश भुदेका :-**

इसके पहिले तो सामान आया है वो पहिले देखनेका है की वो सही कंपनीका है या नही है

**मा. केळकर सो. (उपआयुक्त) :-**

आपण टेंडर कॉल केले त्याच्यात एकुण चार टेंडर आपल्याकडे आले आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सरकारी खाते मे सामान लगता है ना । तो वो कहाँपर रखा जाता है ।

**मा. सभापती :-**

सामान की जानकारी करके लेंगे ।

**महेंद्रसिंग चौहान :-**

कितनी बार हम चुक निकालते है । अब तक दस महिना हो गया है । अधिकारीयों को अपने काम में सुधारणा करनी चाहिए । अभी भी फिगर में चुक निकलती है ।

**मिलन म्हात्रे :-**

आता आपल्याकडे इंन्स्ट्रमेंटचा ठराव आणला आहे. फायर ब्रिगेडच्या गाड्यांना लिकेज आहे. तसेच स्टार्टिंग प्रॉब्लेम असेल तर भरलेल्या गाड्यांना सरास धक्का मारायला लागतो.

**लिओ कोलासो :-**

नियमामध्ये बसणारे आहे ते आपण मंजुर करा व फायर ब्रिगेडचा जो विषय आहे त्याच्यावर आपण स्वतंत्रपणे चर्चा करुया.

**मा. सभापती :-**

टोटल चुक जी झाली आहे ती दुरुस्त करुन घ्या.

**प्रकरण क्र. ८१ :-**

अग्निशमन दलाकरिता टुल्स इनपले टेबल लाईट टॉवर, फ्लोरिंग पंप, कॉंक्रिट कटर इत्यादी साहित्य खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. ७२ :-**

महानगरपालिकेने दि. २५/०४/२००३ ''दै. लोकमत व दै. महाराष्ट्र टाईम्स'' या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धा केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार अग्निशमन दलाकरिता रेक्स टुल्स, इनफ्लेटेबल लाईट टॉवर, प्लोटींग पंप, कॉंक्रीट कटर इत्यादी साहित्य खरेदी (पुरवठा) करणेसाठी खालील ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. एक्साईट फायर इज. प्रा. लि. | मे. द. रॉक्सलिड फायर ॲण्ड सेप्टी इंजिनिअर्स | मे. फायर स्टोन इंडस्ट्रीज | मे. सोलारी इज. प्रा. लि. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | रेक्स टुल्स | ५,४५,०००/- | ५,२७,५००/- | ५,३०,०००/- | ८,८०,२५०/- |
| २) | इनफ्लेटेबल लाईट टॉवर | ३,२५,०००/- | ३,१६,३३५/- | ----- | ----- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३) | प्लोटींग पंप | ३,११,०००/- | ३,१०,१५७/- | ३,१३,५००/- | २,९६,०००/- |
| ४) | कॉंक्रीट कटर | १,२०,०००/- | १,१५,५७५/- | १,२१,५२५/- | २,०४,२६५/- |
| | एकूण रुपये | १३,०१,०००/- | १२,६९,५६७/- | ९,६५,०२५/- | १३,८०,५१५/- |

वरीलप्रमाणे ''मे. फायर स्टोन इंडस्ट्रीज व मे. सोलारी इज. प्रा. लि.'' यांनी निविदेतील अ.क्र. २ चे दर सादर केले नाहीत. मे. द. रॉक्सलिड फायर ॲण्ड सेफ्टी इंजिनिअर्स यांची निविदा कमी दराची आहे.

सदर मालाची जकात महापालिकेस भरावी लागणार आहे. तसेच बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असून मे. दि. रॉक्सलिड फायर ॲण्ड सेफ्टी इंजिनिअर्स यांच्या निविदेस व काम पूर्ण झाल्यानंतर देयक अदा करणेंस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ७ चे कलम ७३(ड) नुसार सभेची मंजुरी देणेंस येत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत शहा.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.८२ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

सभापतीजी गॅरेजवाल्याचे कोटेशन नाही आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

ह्यापूर्वी टँकरचे मेन पार्ट किती कमी आहे ते आपण बघितले का? किती पार्टस चोरीला गेले आहे. त्याची आपण आधी लिस्ट आम्हाला द्या.

**लिओ कोलासो :-**

गाडीचे पार्टस चोरीला गेले आहे. त्याचा रिपोर्ट आहे का?

**मनिश दोशी :-**

फायर ब्रिगेड बरोबर आम्ही चर्चा केली तेव्हा त्यांनी सांगितले की स्टार्टर काढुन ठेवले आहे व जेव्हा पुन्हा त्यांना आम्ही विचारायला गेलो त्यावेळी त्यांनी सांगितले मला माहित नाही.

**लिओ कोलासो :-**

रिर्पोटिंग केली आहे आणि त्याच्यामध्ये एकच वस्तु आपल्याला मिळते व दुसरी वस्तु मिळत नाही. तर ती सर्व जिम्मेदारी त्या फायर ब्रिगेडवाल्यांची आहे. आपण सरळ त्या कर्मचाऱ्यांच्या पगारातुन रक्कम कापा.

**मा. सभापती :-**

प्रशासनामध्ये अशा काही त्रुटी आहेत. त्या आपणाला दुर करायच्या आहेत. आस्थापनाने तिथे किती वॉचमन ठेवलेले आहेत.

**याकुब कुरेशी :-**

तुम्ही त्या वॉचमनवर कार्यवाही करा.

**चंद्रकांत वैती :-**

आज आपल्याकडे अग्नीशमन दलाकरिता प्रोव्हीजन आहे. व आपण त्यांना मागणी केले की, सर्व वस्तु पुरविल्या आहेत. मध्यंतरी त्यांनी पंपाची मागणी केली होती त्यावेळी आपण त्यांना सुचविले होते की एवढा महागडा पंप आणु नये छोटे पंप आणण्यात यावे. आणि जर अशा तऱ्हेने वस्तु चोरीला जात आहे असा प्रश्न उपस्थित झाला आहे. आतापर्यंत आपण फार मोठा खर्च अग्निशमन दलामध्ये केला आहे. आता टँकर रिपेरिंग करण्यासाठी दोन लाख रुपये खर्च करणार आहोत. पण आजही शहरात आग लागल्यावर आपण ती आग विझवु शकत नाही असे दिसत आहे. प्रत्येक महिन्याला अग्निशमन दलाचा विषय असतो परंतु आतापर्यंत त्यांनी कोणते शौर्य गाजवले आहे किंवा त्यांना शौर्य गाजवायला वेळ मिळाला नाही असे ही असु शकते. आता त्यांनी किती सामुग्री मागवली आहे व शहराला ते कसे काय देणार आहेत ते त्यांना दाखवुन द्यायला पाहीजे. आता सभापती साहेबांनी सांगितले एक गाडीची मंजुरी आली आहे तर आपण दोन गाड्या मंजुर करुन टाका.

**लिओ कोलासो :-**

त्यांचा कसलाही मुलायजमा न ठेवता त्यांनी ह्या गोष्टीचा खुलासा करावा. व जो अधिकारी जबाबदार आहे त्याला आपण जबाबदार ठरवावे.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेब स्थायी समितीच्या वतीने विनंती करतो की, आपल्याला जी माहिती असेल ती त्यांनी द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या सभेत लेखी माहिती देतो.

**मा. सभापती :-**

अग्निशामन दलाचा विषय द्यावा व सदरच्या विषयाबाबत सविस्तर माहिती मागवुन घेतो.

**प्रकरण क्र. ८२ :-**

मा. आयुक्त ह्यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे.

**ठराव क्र. ७३ :-**

महानगरपालिकेच्या वाहन विभागाचे दि. ०४/०४/२००३ '' दै. सागर व दै. मुंबई सकाळ '' या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहिर फेर निविदा सुचनेप्रमाणे अग्निशमन विभागातील पाणी टँकर दुरुस्ती करणेसाठी खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा सादर केलेल्या आहेत. दोन्ही टँकर दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे एकत्रित किंमत दिलेली आहे.

| अ.क्र. | मे. कृष्णा ऑटो गॅरेज | मे. ए. डी. मोटर्स | मे. रॉयल ऑटो गॅरेज | मे. क्वालिटी इ.जी.कॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | रु. २,५८,०००/- | रु. २,३२,६५०/- | रु. २,७५,०००/- | रु. ६,५९,२००/- |

श्री. एन. डी. मोटर्स यांची निविदा दर सर्वात कमी म्हणजे रु. २,३२,६५०/- होती. मात्र महानगरपालिकेच्या अटीशर्तीनुसार सदर गॅरेज ठेकेदारांनी नमुद केलेल्या पत्यावर स्वतःचे गॅरेज नव्हते. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकावरील मे. श्री. कृष्णा ऑटो गॅरेज ठेकेदारास वाटाघाटीस बोलविण्यांत आले व त्यांना सदरची दोन्हीही वाहने रु. २,०६,०००/- दुरुस्तज करुन देण्यांतबाबत लेखी दिलेले आहे. त्यामुळे मा. आयुक्त यांनी मे. कृष्णा ऑटो गॅरेजची निविदा मंजूर केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार सदर प्रकरण मा. स्थायी समितीच्या अवलोकनावरुन मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे. अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.८४ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ८४ :-**

मा. आयुक्त ह्यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (सा.बां.वि.)

**ठराव क्र. ७५ :-**

१) दि. ०२/०६/२००३ रोजीच्या दैनिक वार्ताहर या वृत्तपत्रात प्रसिद्धा झालेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीत दुसऱ्या मजल्यावर महापौर दालनांत फर्निचर व इतर साहित्य पुरवून सुधारणा करणेकामी खालील ठेकेदारांनी मुदतीत बाबवार दर सादर केलेले आहेत. खर्च रु. ३.०० लक्ष.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण | मे. किर्ती पी. व्होरा | मे. व्होरा कंन्सट्रक्शन | मे. पारस कंन्स्ट्र. |
|---|---|---|---|---|---|
| १) | १२मी.मी. ग्लास पार्टीशन (सोबत पुरविलेल्या ड्रॉईंगनुसार) | ३००चौ. फुट | ५००/- | ४८०/- | ५१०/- |

| अ.क्र. | तपशिल | परिमाण | मे. किर्ती पी. व्होरा | मे. व्होरा कंन्सट्रक्शन | मे. पारस कंन्स्ट्र. |
|---|---|---|---|---|---|
| २) | ३' ०'' उंच आयर्न पार्टीशन सागाच्या हँडटेलसहित (ड्रॉईंगनुसार) | ६०चौ. फुट | २७५/- | २५०/- | ३००/- |
| ३) | ७०'' x ३०'' साग दरवाला (४x१'') पट्टी व मेलामाईन पॉलिशसहित. | २ नग | ७८००/- | ७५००/- | ८०००/- |
| ४) | २ ६'' उंच टेबल (ड्रॉईंग प्रमाणे) | ४०चौ. फुट | १०००/- | ९५०/- | १०००/- |
| ५) | २०'' उंच शेडेन्झा (ड्रॉईंगनुसार) | १५चौ. फुट | १३९०/- | १३५०/- | १४००/- |
| ६) | ६ मी.मी. ग्लास शेल्व्हज ४ रॅक ४ x १६'' साईज | १ नग | ७००/- | ६८०/- | ७५०/- |
| ७) | टेलिव्हिजन ट्रॉली (ड्रॉईंगनुसार) | १ नग | १३०००/- | १२५००/- | १३१००/- |
| ८) | मा. महापौर खुर्ची (ड्रॉईंगनुसार) | १ नग | ३६०००/- | ३४५००/- | ३६५००/- |
| ९) | मा. महापौर दालन देव्हारा करणे (ड्रॉईंगनुसार) | १ नग | २७००/- | २५००/- | २८००/- |
| १०) | कारपेट (ड्रॉईंगनुसार) | २०चौ. फुट | २००/- | १८०/- | ३८००/- |

वरीलपैकी मे. व्होरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदातील दर सर्वात कमी असून मंजूर करण्यांत आलेले आहे.

२) दि. २६/०३/२००३ रोजी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात नोटीस बोर्डावर प्रसिद्ध झालेल्या जाहिर कोटेशन सुचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत दर्शनी जागावर महानगरपालिकेला लोगो व स्टिल बोर्ड बसविणेकामी आपण सादर केलेली खालील दराचे कोटेशन मंजूर करण्यांत येत आहे. खर्च रु. ४०,०००/-

| अ.क्र. | तपशिल/ठेकेदाराचे नांव | दर |
|---|---|---|
| १) | लाकडी परांची (उंची ६० फुटापर्यंत)<br>अ) पार्श्व ट्रेडर्स<br>ब) मे. किर्ती पी. व्होरा<br>क) मे. क्रिएटिव्ह बिल्डर्स | रु. ३,०००/-<br>रु. ४२५०/- महिना<br>रु. ३०००/- महिना<br>रु. ५०००/- महिना |
| २) | लाकडी परांची लेबरजॉब वर्क (तीन वेळेस)<br>अ) पार्श्व ट्रेडर्स<br>ब) मे. किर्ती पी. व्होरा<br>क) मे. क्रिएटिव्ह बिल्डर्स | रु. १२०००/-<br>रु. ४२५०/- प्रति वेळेस<br>रु. ४०००/- प्रति वेळेस<br>रु. ४५००/- प्रति वेळेस |
| ३) | स्टिलनेस स्टिल बॉक्स टाईपलेटर पुरवठा करुन बसविणे<br>अ) पार्श्व ट्रेडर्स<br>ब) मे. किर्ती पी. व्होरा<br>क) मे. क्रिएटिव्ह बिल्डर्स | रु. ४९५०/- लेटर<br>रु. ५७५/- प्रति लेटर<br>रु. ५५०/- प्रति लेटर<br>रु. ६००/- प्रति लेटर |
| ४) | जुने स्टिलनेस स्टिल बफींग करुन परत लावणे<br>अ) पार्श्व ट्रेडर्स<br>ब) मे. किर्ती पी. व्होरा<br>क) मे. क्रिएटिव्ह बिल्डर्स | रु. १८००/-<br>रु. १८०/- प्रति लेटर<br>रु. १५०/- प्रति लेटर<br>रु. १५०/- प्रति लेटर |
| ५) | फायबर ग्लास लेटर पुरवठा करुन बसविणे.<br>अ) पार्श्व ट्रेडर्स<br>ब) मे. किर्ती पी. व्होरा<br>क) मे. क्रिएटिव्ह बिल्डर्स | रु. १३६५०/-<br>रु. ८७५/- प्रति लेटर<br>रु. ६५०/- प्रति लेटर<br>रु. १०००/- प्रति लेटर |

| अ.क्र. | तपशिल/ठेकेदाराचे नांव | दर |
|---|---|---|
| ६) | मोनोग्रॅम पॅनल बदलून रंगकाम करणे<br>अ) पार्श्व ट्रेडर्स<br>ब) मे. किर्ती पी. व्होरा<br>क) मे. क्रिएटिव्ह बिल्डर्स | रु. ५०००/-<br>रु. ७५००/- प्रति लेटर<br>रु. ५५००/- प्रति लेटर<br>रु. ८५००/- प्रति लेटर |

वरीलपैकी मे. किर्ती पी. व्होरा यांची निविदा सर्वात कमी दराची असून मंजुर करण्यांत आलेले आहेत.

३) दि. ०१/०६/२००३ दै. वार्ताहर, दि. ०२/०६/२००३ सा. सुरज प्रकाश या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विविध कामांकरिता ठेकेदारांपुढील निविदा सादर केलेल्या आहेत. या कामी अंदाजत्रकात २००३-०४ या वर्षाकरिता पुरेशी तरतूद केल्याचे प्रमाणित करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम / दर |
|---|---|---|
| अ) | मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीत गट नेते व पाणी पुरवठा विभागाकरिता कॅबिन तयार करणे.<br>१) मे. पारस कंस्ट्रक्शन<br>२) मे. किर्ती पी. व्होरा<br>३) मे. व्होरा कंस्ट्रक्शन | रु. ७,००,०००/-<br><br><br>३.०० टक्के जास्त दराने<br>२.५ टक्के जास्त दराने<br>अंदाजपत्रकिय दराने |
| ब) | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभुमी, उद्याने, शाळा, इमारती, सार्व. इमारतीमधील विद्युत फिटींग दुरुस्ती करणे<br>१) मे. स्वास्तिक इलेक्ट्रीक कं.<br>२) मे. शेखर इलेक्ट्रीकल्स<br><br>३) मे. डायमंड इलेक्ट्रीक कं. | रु. ७,००,०००/-<br><br><br>१३.०० टक्के जास्त दराने<br>९.५ टक्के जास्त दराने<br>(वाटाघाटीनंतर १ टक्के कमी दराने)<br>१४.५ टक्के जास्त दराने |

वरीलपैकी सर्वात कमी दराच्या निविदा मंजूर करण्यांत आलेल्या आहेत.

४) प्रभाग क्र. १ मध्ये शिवनेरी नगर राई बस स्टॉप या परिसरात कॉंक्रीटीकरण करणे (आमदार फंड) — रु. १,००,०००/-

वरील काम अंदाजत्रक दराने मंजूर करण्यांत आलेले आहे. वरील क्र. १ ते ४ प्रस्तावाचे अवलोकन करण्यांत आले.

**सुचक :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.** **अनुमोदन :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८५ चे वाचन केले.)

**लिओ कोलासो :-**

हा प्रस्ताव कुणाचा आहे.

**मा. सभापती :-**

अशा स्वरुपाची मागणी चालु आहे. टेलिफोन बुथ आहे ते कशा पद्धतीने दिले पाहिजे ते आपण ठरवा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

भुईभाडे लावायचा विषय होता.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब विषय क्र. ८६ हे दोन्ही विषय वेगळे आहे ते वेगळे यायला होते. अपंग आणि गटई हे दोन्ही वेगळे विषय आहेत. गटई आहेत ते खरोखर त्या समाजाचे आहे का? त्याची आपण चौकशी करा. कारण जे चर्मकार आहेत ते बाजुला राहतात व भलतेच लोक उद्याग करतात. तसेच त्या गटई कामगाराच्या नावाने किती परवाने आहेत ते आपण बघा. हा फार गंभीर विषय आहे. आपण ह्याची नोंद करुन घ्या. ही गव्हर्रमेंटची स्कीम आहे पण त्याचे बरोबर इम्प्लीमेंटेशन होत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

गटई कामगारांना चर्मकारांना गाळे देणे ह्याच्यामध्ये आपला प्रमुख उद्दिष्ट आपण असे ठरविले आहे की त्यांना उत्पन्नाचे साधन देणे. सन २००२ च्या काळामध्ये रस्त्यावरचे अतिक्रमण हटविण्यात आले होते. त्यावेळी निश्चित धोरण ठरवले नव्हते. आता ताबडतोब नियमावली बनवावी. तो येथे किती वर्षापासुन राहत आहे. कारण उद्या गटई कामासाठी बाहेरचे लोक येतील. तसेच ज्या व्यक्तीच्या नावाने गाळा बसवुन देणार आहात तिच व्यक्ती तिथे बसली पाहिजे.मुख्य रस्त्याच्या क्रॉस रोडवर त्याची कॅबिन असावी व त्याच्या बाजुला छत्रीचे दुकान बांधतो व छत्री रिपेरिंगचे काम करतो. आपण त्यांना लायसन्स द्यावेत व फी आकारण्यात यावी.  मात्र जर त्यांनी ते दुकान भाड्याने दिले तर त्यांचे लायसन्स ताबडतोब रद्द करावे.

**अशोक पाटील :-**

गटई कामगारांना उदरनिर्वाह द्यायचा आहे. त्याच्यासाठी आपण येथे हा विषय आणला आहे ते योग्य आहे. पण ह्यापूर्वी बऱ्याचश्या टपऱ्या, टेलिफोन बुथ रस्तारुंदीकरणामध्ये गेल्या आहेत त्यांना तुम्ही कुठे जागा देणार आहात.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ह्या विषयाला धरुन बोलतोय. ह्यापुर्वी सांगितले गेले की जे लोक भाजी, मासे विकतात ते पंधरा वर्षापासुन स्थानिक असावे. व त्यांना लायसन्स देऊ आणि आता दुसरा हा विषय आला आहे. विषय आणण्यापुर्वी आपण त्याविषयाचा पाठपुराचा करता का?

**मा. सभापती :-**

अटीशर्ती तयार करायची याबाबत येथे चर्चा झाली व त्या अटीशर्ती आहेत ते स्थायी समितीसमोर येऊ दे व त्यावर आपण पुन्हा चर्चा करुया. केसरीनाथ म्हात्रेजी १९ तारखेनंतर गाड्या उचलायचे काम सुरु करायचे असे सांगितले होते त्याचे आपण काय केले.

**केसरीनाथ म्हात्रे :-**

मागच्या हफ्त्यामध्ये पी. एम. आले होते त्यामुळे आम्हाला पोलीस बंदोबस्त मिळाला नाही. आता येत्या आठवड्यात आम्ही कामकाज करणार आहोत.

**मा. सभापती :-**

चर्चेला विषय येतो सदस्य गांर्भीयाने बोलतात तर आपणाकडुन तसे कामकाज झाले पाहिजे. सदस्याच्या विषयावर प्रामुख्याने गटई कामगारांची तीनशे लोकांची यादी आली आहे. ते आपल्याला भुईभाडे द्यायला तयार आहे असा त्यांचा प्रस्ताव आपल्याकडे आला आहे. ह्यावेळी हा विषय ह्याकरिता आणला आहे की त्याची सर्वसाधारण रुपरेषा आपल्यासमोर यायला पाहिजे. पंधरा वर्ष महराष्ट्रात राहणार तर तो स्थानिक झाला आहे.

**मा. केळकर साो. (उपायुक्त) :-**

शहरामध्ये गटई कामगार किती आहेत त्यांची संख्या काढावी लागणार आहे.

**मा. सभापती :-**

समाजकल्याण योजनेअंतर्गत आपण गटई कामगार घेऊ असे साहेब बोलले. शहरात जे काय आपण सुशोभिकरण करतोय ते चांगले दिसायला पाहिजे म्हणुन हा विषय आपल्यासमोर आणला आहे. तसेच कोणते नियम व निकष काढावे म्हणुन हा विषय आला आहे.

**लिओ कोलासो :-**

केळकर साहेब येथे असताना त्यांनी अधिकृतरित्या गटई कामगारांना लायसन्स देण्याचे काम केले होते आणि जेव्हा विषयपत्रिकेवर आपल्या समोर पुन्हा गटई कामगारांचा विषय आला तेव्हा पुन्हा केळकर साहेब हे आपल्या येथे उपस्थित आहेत. त्यामुळे आपल्याला त्यांचे मार्गदर्शन मिळणार अशी अपेक्षा करतो. आपण काय कसं देणार आहात.२० मी.मी., ४० मी.मी. त्याचे प्लान तयार करायला पाहिजे व तो प्लान कागदावर आम्हाला दाखवायला पाहिजे. तरच आम्ही मंजुरी देऊ.

**शशिकांत शहा :-**

आपण पहिल्यांदा किती लोकांना परमिशन दिली आहे ते दाखवायला पाहिजे होते ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

अदांजे शंभर असतील.

**शशिकांत शहा :-**

त्याचा सर्वे झाला पाहिजे व ते नियमात बरोबर बसतात का ते बघायला पाहिजे. त्याच्यानंतर आपण पुढचा विचार करुया. आपण आधी परवानगी दिलेल्या कामगारांची लिस्ट आणा. आपण एखादा विषय सभेसमोर आणता तर त्याची व्यवस्थित अशी परिपुर्ण माहिती आणायला पाहिजे.

**याकुब कुरेशी :-**

यादी आली आहे. त्याच्यात जुने गटई कामगार किती आहे. ते बघा आपण.

**मा. सभापती :-**

शशिकांत साहेब त्यांचा प्रस्ताव आपल्याकडे असा की, ते भाडे भरायला आपल्याकडे तयार आहेत. वसई, नालासोपारामध्ये असे भाडे घेतले जाते.

**शशिकांत शहा :-**

नगरपालिकेने ज्यांना परवानगी दिली आहे ते बरोबर नियमात बसते का ते आपणाला बघायला पाहिजे. आणि जर नियमात बसत नसेल त्यांना आपण नोटीस दिली तर ते तेथुन उठतात काय?

**मिलन म्हात्रे :-**

शहरात जे गटार आहे त्याच्यात माती टाकुन ते गटार बंद करून तिथे बसले आहेत. ही परिस्थिती आहे.

**लिओ कोलासो :-**

येथे कोण इन्चार्ज आहेत त्यांनी सांगावे की त्यांनी एवढे का सहन केले.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सभापती साहेब माझी आपणा सर्वांना विनंती आहे की ह्याच्यामध्ये गटई कामगार तीनशे आहेत. त्यापैकी शंभर जणांना आपण परवानगी दिलेली आहे. आणि बाकीच्या लोकांना परवानगी मिळायला पाहिजे. आपण प्रत्येक रस्त्यावर बघतो कुठलीही वस्तु विकायला कोणी ना कोणी बसलेले आहेत. गटई कामगारांची तो व्यवसाय आहे. व त्याच्यावरच त्यांची उपजिविका आहे. तर ते काम करणार. ह्या कामात स्थानिक लोकांना तुम्ही प्राधान्य द्या व त्यांना भुईभाडे चालु करुन त्यांना लायसन्स देण्यात यावे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पंधरा वर्षाचा निकष लावा.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर चर्चा झालेली आहे. ह्या विशिष्ट जाती आहेत. त्यापासुन जे काही बेनिफिट मिळणार आहे ते सेंट्रल गर्व्हरमेंटचे आहे. त्याचा उल्लेख होणार नाही हे देखील आपण बघावे.

**मा. सभापती :-**

आपण येथे चांगले मार्गदर्शन दिले त्यामुळे धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

टेलिफोन बुथ देणे आहे. त्याच्यात अंध आणि अपंग असे आहे. पण फक्त अपंगांचा उल्लेख आलेला आहे. त्याच्यात आपण अंधांचा देखील उल्लख करावा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

अपंग, अंधांच्या नावाने आपण टेलिफोन बुथकरिता परवानगी देतो पण त्या ठिकाणी कोणीतरी भलताच व्यक्ती बसतो असे आढळल्यास आपण त्यांचे देखील लायसन्स रद्द करावे.

**मिलन म्हात्रे :-**

असे किती अर्ज प्रलंबित आहे. आपण टर्मीनेट केले का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

ह्याच्यावर तुम्ही सर्व तयारी करा की किती लोक आहे व त्याच्यानंतर आपण हा विषय पुढील सभेत आणा.

**मा. सभापती :-**

ह्याविषयावर फक्त चर्चा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आर.एस.सी. तुम्ही त्यांना द्या कारण आता त्या ठिकाणी टेलिफोन बुथवर जास्त उत्पन्न राहिलेले नाही.

**मा. सभापती :-**

सदरच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली आहे. विषयाची आवश्यक माहिती आणल्यानंतर आपण ह्याचे धोरण ठरवुया.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब सदरच्या विषयावर माझी एक सुचना आहे. आपण अंधांना टेलिफोन बुथ द्यायचे असे आहे. त्याप्रमाणे झुणका भाकर केंद्र आपण दिले आहे. तिथे काय व्यवसाय चालतो हे आपल्याला माहित आहे का? आता आपण हा जो सर्वे करतोय त्याच्यात ही हा विषय घ्या आणि ह्याचा देखील सर्वे करावा.

**दिनेश नलावडे :-**

प्रत्येक झुणका भाकर केंद्राची माहिती घ्या व त्याच्यावर आपण कार्यवाही करा. तसेच जिथे अतिरिक्त काम आहे तोडुन टाका.

**मा. सभापती :-**

झुणका भाकर केंद्रचा विषय सदरच्या विषयासोबत घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ८५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात गटई कामगारांना टपऱ्या देणे व अपंगांना टेलिफोन बुथ देणेबाबत विचार विनिमय करणे.

(कागदपत्रांची पुर्तता नसल्यामुळे सदरचा विषय पुढील सभेत घेण्यांत यावा.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८६ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

दरसुची दिली आहे आता आम्हाला कसं कळणार.

**चंद्रकांत वैती :-**

ह्याच्यावर टिपणी कुठे आहे.

**धनराज अग्रवाल :-**

बजेट में रेट दिया था ।

**महेंद्रसिंग चौहान :-**

आधा इंच और एक इंच का रेट कम किया जाता है ।

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही येथे कशाला मंजुरी द्यायची आहे.

**धनराज अग्रवाल :-**

येथे जो रेट दिला तो माझ्यामते जास्त आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दोन हजाराचे अडीच हजार करायचे. काय करायचे ते आपण आम्हाला द्यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

दशोरेजी ह्याची टिपणी घ्या.

**शशिकांत शहा :-**

आपण हा विषय पुढच्या सभेत घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

पाण्याचे पाईप फुटतात व त्याच्यात गटाराचे पाणी जाते. लोक अर्ज करतात. आपण दोन खड्ड्याचे पैसे घेता हे तुम्हाला संयुक्तिक वाटते का? पण घाणेरडे पाणी मिळु नये चांगले पाणी मिळावे म्हणुन लोकांनी पैसे भरले. पण महानगरपालिकेची पण ड्युटी आहे ना. तुमच्या कडुन पाईप फुटले आहे. तुम्ही काळजी घ्यायला पाहिजे होती. त्याच्यातच तुम्ही शिफ्टींगचे चार्ज घेता.

**धनराज अग्रवाल :-**

ते चार्ज देखील जास्त घेण्यात येतो. रोड वायडिंगमध्ये नळाचे पाईप फुटले तर त्याचा चार्ज हा पुर्ण आम्हाला भरावा लागतो.

**दिनेश नलावडे :-**

आपण जो ठेका दिला होता ५० द.ल.लि. पाण्याचा. आठ ठिकाणी नविन पाईप लाईन टाकली होती. त्या पाईप मधुन प्लास्टीक वगैरे असे वस्तु मिळाले आहे. ते साफ करुन घेतले आहे. तरी अजुन पाणी स्वच्छ येत नाही. जेसल पार्क पासुन पाईप लाईन चेक करावी लागली आहे व दोन तीन ठिकाणी असे फॉल्ट मिळाले आहे. नवघरचे काम चालु आहे. तुम्ही ठेकेदाराला अशाप्रकाराबाबत दोशी ठरवा ना.

**महेंद्रसिंग चौहान :-**

नल दुरुस्ती करनेकी कितनी आवश्यकता है । जनता को साफ पाणी देने की जिम्मेदारी महानगरपालिकाकी है । और अगर वायडिंग में कहाँपर पाईप फुटता है, कुछ होता है तो उसकी सब जिम्मेदारी आपके लोगो की है । प्लम्बर किसी भी सुनता नही है । दो चार हजार रुपया कमानेका उनका यह तरीका हो गया है । किसी भी तरह का चार्जेस न लेकर नल दुरुस्ती करना चाहिए । आपके पास पाणी मे डालनेके लिए औषध है । फिर भी जगह जगह गंदा पानी आ रहा है । इसमे

सुधार करना है । अगर आपको लेना भी हो तो ५००, १५०० रुपये से जादा न ले । मेरी आपको रिक्वेस्ट है आप इसपर अच्छा सजेशन दिजीए । कम से कम पुराने नल कनेक्शन दुरुस्ती व नल कनेक्शन एक जगह से दुसरी जगह मे लेने के लिए कुछ तो करीए ।

**मा. सभापती :-**

रेट्सके बारे मे ॲनॅलिसिस करो । कहाँ कम करना है वो महासभे में विषय जाने वाला है ।

**धनराज अग्रवाल :-**

हा विषय तीन महिन्यांपूर्वी दिला आहे. सचिव साहेबांनी सांगितले आहे की, मी हा विषय संबंधित खात्याकडे पाठविला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नल दुरुस्तीचे आहे, महानगरपालिकेने रोड वायडिंग केले, गटार बांधले त्यांच्याकरिता कनेक्शन तोडावे लागले. पण ज्यांना नळ कनेक्शन घेण्यासाठी एवढ सारे करावं त्यांनी ते चार्जेस भरायला पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

आपण ह्या विषयाचा शेवट करा. चर्चा करण्यासारखं आता नाही. एन.ओ.सी. देतो त्याची फी किती देतो त्याबाबत प्रशासनाची टिपणी नाही. आपल्याकडे चर्चा करायला विषय आणला आहे पण आपण ही चर्चा कशावर करणार आहोत. सविस्तर टिपणी संबंधित खात्याने द्यावी. त्याच्यानंतर हा विषय घेण्यात यावा.

**अशोक पाटील :-**

नविन ना हरकत परवानगी तो विषय काय आहे.

**जेम्स कोलासो :-**

प्रत्येक खात्याने सविस्तर माहिती दयायला पाहीजे.

**लिओ कोलासो :-**

नविन प्रस्ताव टॅक्सेशनचा मांडला व सगळ्यांचाच उद्रेक झाला. बॅनर, होर्डींग्ज हे सर्व विषय स्वतंत्रपणे आणले आहे. तसेच हे आमसभेला क्लीअर आले पाहिजे.

**प्रकरण क्र. ८६ :-**

नळ दुरुस्ती व नविन ना हरकत परवाना / नुतनीकरण दरसुचीबाबत विचार विनिमय करणे.

(कागदपत्रांची पुर्तता नसल्यामुळे सदरचा विषय पुढील सभेत घेण्यांत यावा.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८७ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

टिपणी घेऊन डिसकस करणार आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

ह्याचा आपण जरुर तो फेरविचार करावा.

**प्रकरण क्र. ८७ :-**

जाहिरात कराबाबत विचार विनिमय करणे.

(कागदपत्रांची पुर्तता नसल्यामुळे सदरचा विषय पुढील सभेत घेण्यांत यावा.)

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानुन आजची सभा येथे संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.१० वाजता.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभारी सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**